D:\Kayda Kalam Orders\77-A Aadesh.doc/1

# +महाराष्ट्र शासन


सहायक निबंधक सहकारी संस्था, अलिबाग-रायगड यांचे कार्यालय, नटराज प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी, पी. एन. पी. नगर, २ रा मजला, अलिबाग, ता. अलिबाग, जि.रायगड. दूरध्वनी क्रमांक०२१४१-२२१८९७

E-Mail- arcs_alibag@rediffmail.com


२५ जा.क्र.सनिअ/बी-१/जय हेरंब ही.सो/कलम ७७(अ)/सन२०१८

दिनांक ६/४/२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश

वाचावे : १) श्रीमती ममता मं.साळवी व इतर यांचा दि.२.१२.२०१७ व दि.१६.१२.२०१७ रोजीचा अर्ज.

२) या कार्यालयाकडील दि. ४.१२.२०१७ रोजीचे पत्र.

३) श्री. संजय शिंदे, मुख्य लिपीक यांचा दि. ११.१२.२०१७ रोजीचा अहवाल.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(अ अ अ)(५) व कलम ७७ (अ) मधील तरतूद.

५) श्रीमती नितीन बी.खेदु व इतर यांचा दि.०२/०४/२०१८ रोजीचा अर्ज.

ज्याअर्थी जय हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे ता.अलिबाग जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये सहकार कायद्यान्वये नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. एबीजी/आरजीडी/एचएसजी(टीसी)/ ३५५८/२०१७ दि. १२ / ०४/२०१७ असा आहे आणि,

ज्याअर्थी सदरची संस्था सहकार कायद्यानुसार नोंदणी करणेंत आली असल्याने सदर संस्थेने सहकार कायदा व पोटनियम तसेच वेळोवेळी निर्गमित होणारे परिपत्रकीय सूचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी श्रीमती ममता मं. साळवी व इतर यांचा वाचावे क्र. १ चा तक्रार अर्ज अर्जात नमूद केले आहे की, संस्थेचे अनेक निर्णय पदाधिका-यांकडून इतर कमिटी मेंबर्सना विचारात किंवा ठराव न घेता लागू केले गेले. सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे व वारंवार व हवे तसे बदलणे यामुळे सोसायटीच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. हे बदल परस्पर पदाधिका-यांकडून घेतले गेले. तसेच मासिक सभेचे निमंत्रण लेखी किंवा तोंडी काही कमिटी मेंबर्सना न देणे किंवा सभेपूर्वी दोन तीन तास आधी सांगितले जाते. त्यामुळे सभेस उपस्थित राहणे शक्य होत नाही. संस्थेच्या आर्थिक उत्पन्न किंवा खर्चाचे योग्य प्रकारे नियोजन केले जात नाही. अनेक अवास्तव व गरज नसलेले खर्च स्वत:च्या मर्जीने व कोणत्याही प्रकारचा ठराव विचारविनिमय न करता कमिटी मेंबर्सना अंधारात ठेवून केले गेले. संस्थेच्या सेक्रेटरीकडून सोसायटी सभासदांशी अर्वाच्य भाषेत बोलणे, सभासदांच्या अडचणी समजून न घेता भांडण करणे विशेषत: महिलांशी बोलताना कोणतेही तारतम्य

न बाळगता चुकीच्या पध्दतीने बोलणे, त्यांचेमुळे सभासदांना मानसिक त्रास होत आहे. त्यामुळे सभासदांची सुरक्षितता धोक्यात आल्याची भावना आमच्या मनात निर्माण झाली आहे.

ज्याअर्थी श्रीमती साळवी व इतर यांच्या तक्रारी बाबत श्री. संजय शिंदे, मुख्य लिपीक यांनी दि.११.१२.२०१७ रोजी संस्थेस भेट देवून अहवाल सादर केला.

भेट अहवालावरुन आढळून आले की,

१) समिती सभांचा अजेंडा काढला जात नाही व समिती सदस्यांना पोहोच केला जात नाही.

२) सुरक्षा रक्षक नेमणूक करणे व वारंवार बदलणे या बाबत कोणताही ठराव केला जात नाही.

३) दिवाळीसाठी लाईटिंग रु. २१०००/- खर्च करण्यांत आले. परंतू सदर बाबत कोणताही ठराव केलेला नाही.

४) जमा खर्चास समिती सभेत मंजूरी घेतली जात नाही.

५) समिती सदस्यांना समिती सभेचा अजेंडा (नोटीस) दिली जात नाही. परंतु समिती सभेस उपस्थित राहत नसल्याच्या कारणास्तव समिती सदस्यत्व रद्द करण्याबाबत श्री.नितीन खेदु समिती सदस्य यांना नोटीस देण्यांत आली.

६) संस्थेच्या कामासाठी झालेला खर्च संबंधितांस आदा न करता अन्य व्यक्तींच्या नावे धनादेशाने रक्कमा दिल्या जातात.

७) पार्किंग बाबत दि. ३.१०.२०१७ रोजीच्या संचालक मंडळ सभेत निर्णय घेण्यात आलेत. सदर बाबत पोटनियम क्र.७८ ते ८४ अन्वये कार्यवाही केलेली नाही.

ज्याअर्थी श्री.नितीन बी.खेदू व इतर ८ समिती सदस्य यांनी वाचावे क्र.५ अन्वये त्यांनी समिती सदस्य पदाचे राजीनामे दिले आहेत. त्यांच्या प्रती या कार्यालयास देवून विनंती केली आहे की, सदर संस्थेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्याची विनंती केली आहे.

ज्याअर्थी जय हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे या संस्थेची समिती सदस्य संख्या ११ होती. परंतु उपरोक्त वाचावे क्र. ५ अन्वये ८ समिती सदस्यांनी राजीनामे दिले असल्याने उर्वरित ३ समिती सदस्य संख्या सद्यस्थितीत अस्तित्वात आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(अ अ अ)नुसार समिती सदस्य संख्या दोन तृतीयांश असणे आवश्यक आहे.

परंतु जय हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.चेंढरे ता.अलिबाग या संस्थेच्या ८ समिती सदस्यांनी राजीनामे दिल्याने सदर संस्थेची समिती सदस्य संख्या दोन तृतीयांश पेक्षा कमी आहे. त्यामुळे समितीची रचना रितसर होत नसल्याने समितीच्या रचनेत दोष निर्माण झाल आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. त्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे.

ज्याअर्थी संस्थेच्या बहुसंख्य सभासदांनी मागणी केलेनुसार त्यांचे संस्थेतील तीन जणांचे प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्त करणेबाबत वाचावे क्र.५ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी रमेश शेरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग- रायगड, जय हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे ता.अलिबाग जि. रायगड या संस्थेवर खालीलप्रमाणे प्राधिकृत अधिका-यांचे मंडळ नियुक्त करीत आहे.

१) श्रीमती रुपाली नितीन खेडू, अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी मंडळ
२) श्रीमती आदिती उन्मेश म्हात्रे, सदस्य, प्राधिकृत अधिकारी मंडळ
३) श्रीमती शुभांगी संतोष भगत, सदस्य, प्राधिकृत अधिकारी मंडळ

सदरचा आदेश आज दि. ६ /४/२०१८ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिलेला आहे.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ०६ /०४/२०१८

सही
(रमेश शेरे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अलिबाग जि.रायगड

प्रत :-
१) श्रीमती रुपाली नितीन खेडू, अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी मंडळ
२) श्रीमती आदिती उन्मेश म्हात्रे, सदस्य, प्राधिकृत अधिकारी मंडळ
३) श्रीमती शुभांगी संतोष भगत, सदस्य, प्राधिकृत अधिकारी मंडळ
२/- आपणांस सूचित करण्यांत येते की, आपण सदर संस्थेचा पदभार स्विकारुन तसा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.
४) अध्यक्ष/सचिव/खजिनदार , जय हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरें ता.अलिबाग
आपणांस सूचित करण्यांत येते की, संस्थेच्या संपूर्ण दप्तराचा ताबा प्राधिकृत अधिकारी मंडळाकडे तात्काळ सुपूर्द करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
५) व्यवस्थापक, दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा अलिबाग
६) संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी
७) संग्रह.

Bhere 6.4.18

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अलिबाग जि.रायगड